# महाराष्ट्र शासन
# वनविभाग
# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय.

वनविभागातील गट-क संवर्गातील वनरक्षकाची रिक्त पदे भरण्याकरिता **जाहिरात क्रमांक १ (एक) दिनांक १४ सप्टेंबर,२०१६.**

**वनवृत्त कोल्हापूर** यांचे अधिपत्याखालील **कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी व सिंधुदूर्ग** या जिल्हयांमध्ये **वनरक्षक** पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व वनविभागात भरतीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये महाऑनलाईन (Maha Online) यांचेमार्फत **दिनांक १७.१०.२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** online अर्ज मागविण्यांत येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना महाऑनलाईन (Maha Online) या संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन **अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.**

**आरक्षित पदांचा तपशील :-**

| विभाग / कार्यालयाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| सन २०१६ करीता | ३ | ६ | १ | १ | ० | ० | १ | ९ | २२ | ४३ |

उपरोक्त आरक्षणाच्या अनुषंगाने **समांतर आरक्षण** खालील प्रमाणे आहे.

| विशेष/समांतर आरक्षण | अ.जा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| महिला ३०% | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ७ | १३ |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भुकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक १५% | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ५ |
| अति उच्च, गुणवत्ताधारक खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अंशकालिन १०% | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| रोजंदारी वनमजूर १०% | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ४ |
| होमगार्ड ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| सर्वसाधारण १८% (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) | २ | १ | १ | १ | ० | ० | १ | ३ | ५ | १४ |
| एकूण | ३ | ६ | १ | १ | ० | ० | १ | ९ | २२ | ४३ |

**विशेष टिप -** जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्या ही **दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत रिक्त होणा-या पदावर** आधारीत असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/२०१५/वित्तीय सुधारणा-१, दि.१५.१.२०१६ अन्वे वनरक्षक संवर्गातील रिक्त पदांपैकी ५० टक्केपर्यंत पदे भरण्यास मुभा दिलेली आहे. शासनाकडून भविष्यात वाढीव पदे भरणेस मान्यता प्राप्त झालेस, त्यानुसार उपलब्ध अनुशेष व त्याअनुषंगाने वाढीव रिक्त पदे भरणेकरीता संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये तशी सूचना प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. **जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

**"रिक्त पदांची प्रवर्गनिहाय व एकूण संख्या परिवर्तनीय असून त्यामध्ये वाढ किंवा घट होवू शकते."**

१. **वेतनश्रेणी :-** (रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड पे - रु.१८००)

२. **शैक्षणिक पात्रता :- उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा गणित किंवा विज्ञान किंवा भूगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह उत्तीर्ण.**

**जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अमरावती / नागपूर यांनी असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दि.५ ऑक्टोबर, १९८९ नुसार एसएससी पास माजी सैनिकांना ज्यांची सैन्य सेवा १५ वर्ष झालेली आहे, त्यांना ज्या पदासाठी पदवी ही पात्रता आवश्यक आहे, त्या ठिकाणी ग्राहय धरण्यात येते. वनविभागाव्दारे करण्यात येत असलेल्या वनरक्षकांच्या पदांच्या भरतीमध्ये ज्याकरीता १२ वी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, त्याकरीता एसएससी पास आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे, असे माजी सैनिकांना वनरक्षक पदासाठी पात्र ठरविण्यात यावे.**

**विविध शासकीय कार्यालयाव्दारे वेगवेगळया पदांच्या भरतीसाठी ज्याकरीता शैक्षणिक पात्रता ही १२ वी पास असते, त्याकरीता सैन्य सेवेतील पदवी ही ग्राहय धरण्यात येत असते. म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेव्दारे दिलेल्या खुलाशानुसार अटी व शर्ती पुर्ण करणारे माजी सैनिकांना माजी सैनिक या समांतर आरक्षणाचे पदाकरीता अन्य आवश्यक अटी व शर्तीचे अधिन राहून शैक्षणिक पात्रतेचे दृष्टिने पात्र ठरविण्यात यावे.**

(१) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण केली असल्यास (इयत्ता १० वी) या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

**टिप :- नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरीता शासकीय वैद्यकिय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडून निर्गमीत केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात यावे.**

३.० **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे **वय दि. २६ सप्टेंबर,२०१६ रोजी** किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

### ३.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.

(एक) **महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.**

(दोन) **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील."**

(तीन) **पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत. याकरीता शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,शासन निर्णय क्रमांक राक्रीधो- २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.१ जुलै,२०१६ मधील तरतूदी लागू होतील.**

(चार) **प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.**

(पाच) **वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक एलएबी १०९४/ प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१-७-२००३ नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथिलक्षम.**

(सहा) **"सुशिक्षित बेराजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.**

(सात) **शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र.बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९ मंत्रालय,मुंबई दिनांक १६.१०.२०१२ मधील तरतूदीनुसार रोजंदारी वनमजूरांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.**

(आठ) **स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य असलेल्या खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांकरीता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.**

(नऊ) **सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील खुल्या प्रवर्गातील व मागासवर्गीय उमेदवारांना सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.**

(दहा) **होमगार्ड उमेदवारांकरीता विहीत केलेली वयोमर्यादा.**

(अकरा) महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- एलडीबी-१०१६/ प्र.क्र.११३/७-स, दिनांक ३१ ऑगष्ट,२०१६ मधील तरतूदीनुसार शिखर भूविकास बँक व जिल्हा भूविकास बँकांच्या ज्या कर्मचा-यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे, अशा कर्मचा-यांच्या वयाची कमाल मर्यादा शिथील करुन असे कर्मचारी नोकर भरतीच्या प्रचलीत पध्दतीनुसार व त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे संदर्भाधीन शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षापर्यंत राज्य शासनाच्या सेवेत भरतीसाठी पात्र ठरविण्यात आलेले आहेत. सदरची वयोमर्यादा शासन निर्णयाच्या दिनांकापासून दि.२४.७.२०१५ पुढील तीन वर्षापर्यंत राज्य शासनाच्या सेवेत भरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरविण्यात आले आहे. नोकर भरतीसाठी अर्ज करण्यासाठी वयोमर्यादेच्या अनुषंगाने सहकाय आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी संबंधीत पात्र कर्मचा-यांना प्रमाणपत्र द्यावे. सदर प्रमाणपत्र नोकरभरतीच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

## ४.० वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.

| **शारीरीक माप** | **उमेदवाराचा प्रवर्ग** | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |
| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

(चार) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**<u>दूरदृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| | (सुधारलेली दृष्टी) |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**<u>जवळील दृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सूट देण्यात येईल.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणा-या खेळाडूना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत:-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ सेन्मी.फुगवून.

(फ) **किमान सापेक्ष ऊंची, वजन व छातीची मोपमापे :-**
**शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११**

**उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये महाराष्ट्र वनसेवेतंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहीत केलेल्या ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही ऊंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकिय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरीता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष संधी, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.**

४. **<u>निवडीची पध्दत</u> :-**

४.१ उमेदवारांचे अर्ज online पध्दतीने प्राप्त झाल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी **महाऑनलाईन मार्फत** त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

**<u>शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र</u>:-**

४.२ **उमेदवार हा शारीरीक क्षमता चाळणी चाचणीकरीता शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराने मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिकारी यांचेकडून स्वत: प्राप्त करुन घेऊन धावण्याच्या चाळणी परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. वैद्यकीय प्रमाणपत्राखेरीज चाळणी परीक्षेसाठी भाग घेऊ दिला जाणार नाही याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.**

**<u>धावण्याची चाळणी परीक्षा</u>**

- शारीरीकदृष्टया सक्षम उमेदवारांची प्राधान्याने निवड करण्याच्या दृष्टीने किमान शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट तसेच शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या पात्र उमेदवारांची धावण्याची चाळणी चाचणी घेण्यात येईल.
- या धावण्याच्या चाळणी चाचणीमध्ये उमेदवारांना पोलीस शिपाई भरती प्रक्रियेच्या धर्तीवर प्रथमत: पुरुष उमेदवारास ५ कि.मी. व महिला उमेदवारास ३ कि.मी. धावण्याच्या शर्यतीमध्ये भाग घेणे अनिवार्य असेल.
- **<u>ही धावण्याची चाळणी चाचणी परीक्षा स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.</u>**
- **सदर धावण्याच्या चाळणी चाचणीमध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या तीन पट एवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यांत येतील.**
- **उमेदवारांची संख्या निश्चित करताना विहीत करण्यात आलेले आरक्षण विचारात घेण्यात येईल.**
- **उपरोक्त धावण्याची चाळणी चाचणी उमेदवाराने जास्तीत जास्त ३० मिनीटात पूर्ण करणे आवश्यक राहील.**
- **शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/ प्र.क्र.२८७/फ-४, दिनांक २१ जुलै,२०१४ नुसार धावण्याच्या चाचणी परीक्षेमध्ये उमेदवारांना खालीलप्रमाणे गुणांचे भारांकन देण्यांत येईल.**
  **(१) पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (क्र.१ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी - १० गुण**
  **(२) त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (क्र.४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी - ८ गुण**
  **(३) त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (क्र.९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी - ६ गुण**
  **(४) त्यानंतर येणा-या १० उमेदवारास (क्र.१६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी- ४ गुण**
  **(५) त्यानंतर येणा-या १५ उमेदवारास (क्र.२६ ते ४० वरील आलेले)यांना प्रत्येकी - २.५ गुण**
  **(६) ४० व्या क्रमांकाचे नंतर आलेल्या उमेदवारास १२.५ पैकी शुन्य (०) गुण मिळेल.**

**धावण्याच्या या परिक्षेमध्ये उमेदवार ज्या क्रमांकाने स्पर्धा पूर्ण करतील, त्या क्रमानेच प्रवर्गाचा विचार न करता गुणानुक्रम यादी तयार करुन गुण देण्यात येतील. यामध्ये प्रथम येणा-या ४० पुरुष उमेदवारांना व प्रथम येणा-या ४० महिला उमेदवारांना वरीलप्रमाणे गुणांचे भारांकन देण्यात येईल.**

**तद्नंतर शारीरीक पात्रता तपासणी व मूळ कागदपत्रे तपासणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी महाऑनलाईन च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.**

वनरक्षक भरती प्रक्रियेमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार असून जास्त प्रमाणात अर्जांची संख्या होणार असल्यामुळे उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, आरक्षण प्रवर्ग इत्यादी पात्रता बाबतचे कागदपत्रांची तपासणी करण्याची तारीख ही धावण्याची चाळणी चाचणी घेतल्यानंतर ठेवण्यांत आली आहे.

**४.३ शारिरीक पात्रता तपासणी व मूळ कागदपत्रांची तपासणी**

१. वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारिरीक पात्रता धारण करतात किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

२. शारिरीक पात्रता धारण करणा-या उमेदवारांची मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यांत येईल. **त्यासाठी अर्जामध्ये दावा करण्यांत आलेली सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहतील. तसेच उमेदवारांनी साक्षांकित प्रमाणपत्राचा एक संच सोबत आणणे आवश्यक आहे.**

३. **मूळ कागदपत्रांचा तपशील**

(१) माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) प्रमाणपत्र (जन्मतारखेच्या पुराव्याकरीता)

(२) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र व गुणपत्रक (एखादा उमेदवार दोन अथवा तीन संधीमध्ये १२ वी उत्तीर्ण झालेला असेल तर सर्व मूळ गुणपत्रके सादर करणे बंधनकारक राहील.

(३) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र)

(४) सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र.

(५) **निकटतम वर्षाचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले किमान दिनांक ३१.३.२०१६ अखेर वैध असलेले प्रमाणपत्र अथवा कमाल दिनांक ३१.३.२०१७ अखेर वैध असलेले विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र)**. सदरचे प्रमाणपत्र विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग यांना सादर करणे आवश्यक आहे.

खुल्या प्रवर्गामधील महिला उमेदवारांनादेखील विहीत नमुन्यातील नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : संक्रीआ-२०१०/(प्र.क्र.२७०/१०)/क्रीयुसे-२ मंत्रालय, मुंबई दिनांक १७ ऑगष्ट,२०१० मधील तरतूदीनुसार खेळाडूंसाठी आरक्षित असलेल्या जागेसाठी दावा करणा-या उमेदवारांना नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्यांची आवश्यकता नाही.**

(६) प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांना सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.

(७) होमगार्ड उमेदवारांकरीता सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र व तद्संबंधी सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक. सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणीचे वैध प्रमाणपत्र.

(८) "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांकरीता तद्संबंधी सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.

(९) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य असलेल्या उमेदवारांकरीता सक्षम प्राधिकारी यांचेकडील नामनिर्देशनाबाबतचे प्रमाणपत्र.

(१०) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांनी त्यांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.

(११) माजी सैनिकांच्या बाबतीत एसएससी पास असलेचे प्रमाणपत्र आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्य सेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे असे प्रमाणपत्र.

(१२) अति उच्च गुणवत्ता धारक खेळाडूंनी शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०.४.२००५ तसेच २० सप्टेंबर,२०१३ मधील अटी, शर्ती व तरतूदीनुसार विहीत असलेल्या मान्यताप्राप्त खेळासंबंधी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

(१३) रोजंदारी वनमजूरांना सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र.

(१४) शिखर भूविकास बँक व जिल्हा भूविकास बँकांच्या कर्मचा-यांचे बाबतीत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी संबंधीत पात्र कर्मचा-यांना दिलेले प्रमाणपत्र

**(१५) महाऑनलाईन कडे online सादर केलेल्या अर्जाची प्रत (संगणक Print)**

टीप :- **ऑनलाईन द्वारे अर्ज सादर करुन अथवा खोटी कागदपत्रे सादर करुन जे उमेदवार नोकरी मिळवतील अथवा कागदपत्राच्या छाननीच्या वेळी काही बाबी निवड समितीच्या निदर्शनास न आलेस व भविष्यात कोणत्याही टप्प्यावर उमेदवार नेमणूकीसाठी अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार सेवेतून तात्काळ कमी करण्यात येईल व त्यास सेवेविषयक कोणतेही फायदे अनुज्ञेय राहणार नाहीत.**

**४.४ अर्हंता संदर्भात कागदपत्राची तपासणीमध्ये काही उमेदवार अपात्र ठरल्यास अशा स्थितीमध्ये धावण्याची चाळणी चाचणीच्या सर्वसाधारण गुणवत्ता क्रमानुसार त्याच प्रवर्गातील तद्नंतरचे क्रमांकावरील उमेदवारांना भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देण्यात येवून त्या उमेदवारांचे नांव जाहिर करण्यात येईल व त्याप्रमाणे त्या उमेदवारांची अर्हंता संदर्भात कागदपत्राची तपासणी करण्यात येईल.**

**४. ५ कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रानिमं १२१४/प्र.क्र.(४३/१४)/ १३-अ दिनांक ५ जून,२०१४ मधील तरतूदीनुसार उमेदवारांची मौखिक चाचणी (मुलाखत) घेण्यांत येणार नाही.

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई कडील पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/ प्र.क्र.२८७/फ-४, दिनांक २१.७.२०१४ नुसार वनरक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त होणारे गुणांना १२.५०% भारांकन देण्यासाठी शासनाने मंजूरी दिलेली आहे. शैक्षणिक अर्हंता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या (इयत्ता १२ वी मधील) टक्केवारीचे ८७.५% केलेले भारांकन व १२.५% भारांकन करीता धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई कडील पत्र क्रमांक एफएसटी ११/१३/प्र.क्र.६१८/फ-४, दिनांक ६ मार्च,२०१४ नुसार माजी सैनिकांसाठी वनरक्षक पदासाठी फक्त इयत्ता १० वी चेच गुण विचारात घेऊन निवड यादी तयार करण्यांत येईल. माजी सैनिक उमेदवारांना इयत्ता १० वी मधील टक्केवारीचे ८७.५% केलेले भारांकन व १२.५% भारांकन करीता धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन माजी सैनिक उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

शासनाव्दारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवादयांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व अशा वनकर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी इ. १० मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) एकूण गुण विचारात घेवून गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इ. १० वी / १२ वी मधील गुणांना ८७.५ % ऐवढे भारांकन व १२.५% भारांकन करीता धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

४.५ <u>उमेदवारांची चालण्याची चाचणी</u>

- बहुतांश वनक्षेत्र हे भौगोलीक दृष्टया दुर्गम क्षेत्रात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वनविभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील पद **(Frontline Staff)** असून वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टिने वनक्षेत्रात पायी फिरून गस्त घालणे आवश्यक असते.
- त्यामुळे वनरक्षक या पदासाठी पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे अशी शारीरीक क्षमता चाचणी विहित करण्यात येत आहे.
- **निवड केलेल्या उमेदवारांचीच २५ कि.मी./१६ कि.मी. चालण्याची शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात यावी. सदर चाचणीमध्ये काही उमेदवार अपात्र ठरल्यास अशा स्थितीमध्ये धावण्याची चाळणी चाचणीच्या सर्वसाधारण गुणवत्ता क्रमानुसार त्याच प्रवर्गातील तद्नंतरचे क्रमांकावरील उमेदवारांना भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देण्यात येवून त्या उमेदवारांची चालण्याची शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल व यामध्ये उमेदवार पात्र ठरल्यावर त्यांची पूरक निवड यादी जाहिर करण्यात येईल.**
- सदर चाचणी पुरुष व महिला उमेदवारांनी जास्तीत जास्त ४ तासामध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील. **अन्यथा सदरचे उमेदवार निवडीकरीता अपात्र ठरतील याची नोंद घ्यावी.**

**४.६ समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रानिमं-१२१५/(प्र.क्र.५५/१५) १३-अ दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ मधील तरतुदीनुसार राहील.**

## ४.७ निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या :-
**(शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.१९/१०/०७)**

निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असावी.

| प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय संख्या |
|---|---|
| (१) १० पदापर्यंत | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करावा. |
| (२) ११ ते ३० | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतु किमान ५ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करण्यात यावा. |
| (३) ३१ व त्याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतु किमान ८ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करण्यात यावा. |

**निवडसूचीची कालमर्यादा :-**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा नवीन सुची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत या पैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधी ग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

## ५. सर्वसाधारण अटी :-

५.१. सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

५.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

५.३ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणाअंतर्गत भुकंपग्रस्तासाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागू राहील"

५.४ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि इतर प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदाच्या तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

५.५ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६ /प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात त्यांची जात **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे म्हणजेच किमान दिनांक ३१.३.२०१६ अखेर वैध असलेले अथवा कमाल ३१.३.२०१७ अखेर वैध असलेल्या कालावधीचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.**

**खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.**

५.६ **महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे म्हणजेच किमान दिनांक ३१.३.२०१६ अखेर वैध असलेले अथवा कमाल ३१.३.२०१७ अखेर वैध असलेल्या कालावधीचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.**

५.७ **रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय व आदिवासी विकास प्रकल्प इत्यादि कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर महाऑनलाईन च्या संकेतस्थळावर विहित केलेल्या पध्दती प्रमाणे विहीत वेळेमध्ये अर्ज सादर करावा.**

५.८ **वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजूरानी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता विहित केलेल्या online पध्दती प्रमाणे विहीत वेळेमध्ये अर्ज सादर करावा.**

५.९ अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियत कालीक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

५.१० **पडताळणी अंती अर्ज रद्य ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहेत.**

५.११ **सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.**

५.१२ **उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणी चाळणी परिक्षा इ. करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.**

५.१३ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकुण ५ % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.

५.१४ "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

५.१५ महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९,दि.१६.१०.२०१२ मधील तरतुदीनुसार ज्यांची वन विभागातील सलग पध्दतीने अथवा तुटक तुटकरित्या सेवा पांच वर्षापेक्षा जास्त झालेली आहे, अशा विहीत शैक्षणिक व शारिरीक पात्रता पूर्ण करीत असलेल्या रोजंदारी मजूरांना अंशकालीन कर्मचा-याप्रमाणे वयाची सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल.

५.१६ सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पंअक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६ अ दिनांक २६ ऑगष्ट २०१० अन्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

**६. सेवाशुल्क :-**

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना रुपये ३००/- आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांना रुपये १५०/- सेवाशुल्क जाहिरातीत नमूद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भरावे लागेल. **(सेवाशुल्क नापरतावा राहील)**

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०७९/०/४८२/१६-अ, दिनांक ३ जुलै, १९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी तसेच अर्जाचे फी मधुन सुट दिलेली आहे.**

७. **अर्ज स्विकृतीची अंतिम तारीख** :- उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्याची (रजिस्ट्रेशन) सुविधा **दिनांक १७.१०.२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** संबंधित संकेतस्थळावर उपलब्ध राहील. केवळ नोंदणी (रजिस्ट्रेशन) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही. चलनाद्वारे कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसाच्या आत भरती प्रक्रिया शुल्क जमा करुन उर्वरित अर्ज पूर्णपणे भरणे आवश्यक आहे.

**८. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

| **अ.क्र.** | **कार्यक्रम** | **दिनांक** | |
|---|---|---|---|
| | | **पासून** | **पर्यंत** |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | २६.९.२०१६ | १७.१०.२०१६ |
| २. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | २६.९.२०१६ | १९.१०.२०१६ |
| ३. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक १९.१०.२०१६ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | .. | १९.१०.२०१६ |

**९. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सुचना:-**

९.१ **उमे**दवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.kolhapurforest.co.in व http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

९.२ पात्र उमेदवाराला वेब बेस (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक २६/०९/२०१६ ते १७/१०/२०१६ या कालावधीतच http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.३ अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले व बनावट दाखले सादर करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे गैरप्रकार करणा-या उमेदवारांना निवडींसाठी अनर्ह ठरविणे प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर वनवृत्त,

कोल्हापूर यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

९.४ वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

९.५ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्यास दाखला, एस.एस.सी. पीरक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल.

९.६ एस.एस.सी/मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला,जन्माचा दाखला या प्रमाणपत्रवरील जन्मदिनाकानुसार अर्जामध्ये जन्मदिनाक निवडावा.स्त्री/पुरुष संदर्भात संबधित पर्याय निवडावा.तसेच अमागास, नॉन-क्रिमीलेअर, माजी सैनिक, खेळाडू प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन इत्यांदी संदर्भात लागू असलेली माहिती निवडावी.

९.७ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी.संबधित परिक्षेच्या गुणपत्रकावरील दिनाक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनाक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

९.८ गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

९.९ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.
१.प्रोफाईल निर्मिती/प्रोफाईल अद्यावत करणे.
२.अर्ज सादरीकरण.
३.शुल्क भरणा.

९.१० प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे.

१.https://maharecruitment.mahaonline.gov.in या सकेंतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरिता नवीर वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल.नवीर खाते (वारकर्त्याचे नाव.Login व Password) निर्माण करण्यासाठी लाग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

२.प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच ई मेल आय.डी.,मोबाईल क्रंमाक व जन्म दिंनाक नोदविणे आवश्यक आहे.

३.उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई मेल आयडी व भ्रमणध्ध्वनी क्रंमाक असेणे आवश्यक आहे.तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्र्व्यवहार,प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रंमाक वैद्य/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

४.वरील प्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झालेनंतर वापरकर्त्याने (Login व Password) व्दारे प्रवेश करुन प्रोफाईल मध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती संपर्क तपशिल,इतर माहिती,शैक्षणिक अर्हता,अनुभव इत्यादी संदर्भातील तपशिलाची अचुकनोंद करावी.

५.फोटा व स्वाक्षरी अपलोड करणे:-

नोंदणीची प्रक्रिया व प्राफाईल व्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ सें.मी. x उंची ४.५ सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

१) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनूसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

४) विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळया शाईच्या पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.

५) उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाही.

६) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

७) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेट मध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी ५० kb पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईज ५० kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours, etc. व्दारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

८) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**९.११ अर्ज सादरीकरण:**

१ http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डव्दारे यशस्वीरित्या प्रवेश (Login) केल्यानंतर ऑनलाईन अर्ज येथे क्लिक करावे. जाहिरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२ ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा या ठिकाणी क्लिक करावे.

३ उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासले. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

४ जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीता नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरीत्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

५ रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बँकिंग (३५ +बँका) व्दारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे, संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे चलनाव्दारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारु शकेल.

६ http://maharecruitment.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**९.१२ शुल्क भरणा:**

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

१ शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

२ "माझे खाते"या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now"अशी लिंक उपलब्ध असेल.

३ Pay Now या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होती (अ) ऑनलाईन पेंमेट (ब) नागरी संविधा केंद्र. (क) चलनाव्दारे.

४ क्रेडीट,डेबीट कार्ड अथवा नेट बॅकीगच्या सहाय्याने ऑनलाईन पेंमेट करता येईल.

५ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास,उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिंनाकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

६ ज्या उमेदवारांना इंटरनेटव्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा-ई-केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. याचवेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व सेवा केंद्राचे शुल्क स्वीकारले जाईल. उमेदवाराला पैसे भरल्याची पावती महा-ई-सेवा केंद्रा तर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो/स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्रचालकाकडून आकारली जाईल.

७ चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास उपलबध होणा-या चलनाची प्रत घेवून भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेत बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

८ भारतीय स्टेट बॅंकेमध्ये चलनाव्दारे भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या २ तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

९ चलनाव्दारे शुल्क स्वीकारण्याकरीत भारतीय स्टेट बॅंक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानूसार सेवाशुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरताना परिक्षा शुल्क + बॅंकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

**९.१३ सर्व साधारण सुचना:**

१ नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.

२ अर्ज मराठी व इंग्रजी मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला तरी संगणक प्रक्रियेकरीता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती कॅपीटल लेटर्स मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा आदयाक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या/पत्ताच्या दोन भागामध्ये एक स्पेस ने जागा सोडावी.

३ महिला उमेदवारानी पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

४ SSC अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास त्यासंबंधीच्या बदला संदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावीत.

५ पत्र व्यवहाराचा स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यवसायीक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा/संस्थेचा पत्ता पत्रव्यवहाराचा देवू नये.

६ अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केल्याच्या सारांश पत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रातील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने/मिळाल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

७ संबंधीत पदाच्या/परिक्षेच्या जाहिरात अधिसुचनेमध्ये दिलेल्या सर्व सुचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल. व त्याच्या आधारेच निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

८ एकाहून अधिक सेवेच्या/पदाच्या अथवा इतर परिक्षा अथवा मुलाखती एकाच दिवशी असल्यास त्याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. परिक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. तसेच भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करता येणार नाही.

**९.१४ वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.**

**९.१५** उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छीत आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व इमेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास वनविभाग जबाबदार राहणार नाही.

**९.१६** उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/उपस्थितीपत्रावर एकाच प्रकरची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्वठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

**९.१७** पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट कागदपत्रे तपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

**९.१८** अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाणणीशिवाय शारीरिक क्षमता चाळणी चाचणी परिक्षेस परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारस शारिरिक क्षमता चाळणी चाचणी परिक्षेत उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ शारिरीक क्षमता चाळणी परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबंधीत पदाच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

**९.१९** भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्याअनुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.kolhapurforest.co.in व http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरतीप्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**९.२०** विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही.

**९.२१** उमेदवाराने आपला वैध इमेल आयडी व भ्रमणध्वनी नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर इमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन नोंदविलेला इमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीच्या/अपुर्ण असल्यास तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामुळे संपूर्ण भरतीप्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच इमेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना वनविभाग जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र Download करण्याबाबतचा संदेश इमेल/एसएमएस व्दारे कळविण्यास येईल. उमेदवाराने आपल्या इमेल आयडीची कोणत्याही इतर व्यक्तीसोबत देवाण-घेवाण करु नये. एखादया उमेदवाराचा वैध इमेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा इमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

**१०. महत्वाच्या सूचना :-**

१. पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये.

२. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

३. भरती प्रक्रियेचा कालबध्द कार्यक्रम अ.क्र. १२ मध्ये उपलब्ध करण्यात आलेला आहे.

४. शारिरीक क्षमता चाचणीकरीता प्रवेशपत्र उमेदवारास पत्राद्वारे पाठविण्यात येणार नसून प्रवेशपत्र व परिक्षा स्थळाचा पत्ता हे महाऑनलाईन या संस्थेच्या संकेतस्थळावर चाचणीपूर्वी सुमारे आठ दिवस आधी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशपत्राची Print स्वत: उमेदवाराने प्राप्त करुन घ्यावी. उमेदवारांनी त्यांचा अर्ज क्रमांक संकेतस्थळावर नमूद करुन लॉगऑन केल्यानंतर प्रवेशपत्राची सॉफ्टकॉफी संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

५. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रूटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. अंतिम निवडीपूर्वी कागदपत्र तपासणीच्या वेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

६. शारिरीक क्षमता चाचणीनंतर आरक्षण विचारात घेऊन पात्र उमेदवारांची नांवे शारिरीक पात्रता तपासणी इ.करीता **महाऑनलाईन या संस्थेच्या** संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील.

७. संबंधित पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची शारिरीक क्षमता चाचणी, शारिरीक पात्रता तपासणी ही उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे यांची पूर्वतपासणी न करता घेतली जाणार आहे. मात्र कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच तसेच शारीरीक पात्रता पूर्ततेच्या अधीन राहून पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यांत येईल.

८. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नांवनोंदणी केली असली तरी सदर पदासाठी विहित नमुन्यात रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

९. अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील स्वतःजवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

**११. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-**

१. प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र online भरणे आवश्यक राहील.

२. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

३. निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहित केलेल्या भाषेची परीक्षा तसेच संगणक परीक्षा उतीर्ण होणे आवश्यक राहील.

४. वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी एका वर्षाचा वनरक्षक अभिक्रम प्रशिक्षण पाठयक्रम यशस्वीरित्या पुर्ण केल्यावर वनरक्षक पदावर त्याची नियुक्ती केली जाईल.

५. आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार विहित वेळात सादर करणे आवश्यक राहील.

६. उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

७. निवड झालेल्या उमेदवारांची वनवृत्ता अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

८. पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

९. उमेदवारांनी शारीरीक क्षमता चाचणी इत्यादी वेळी खालील नमुन्यातील (A४ आकाराच्या कागदाच्या अर्ध्या पानावर) ओळखपत्र सोबत आणावेत. सदरचे ओळखपत्र सर्व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक राहील.

**कोल्हापूर वनवृत्त - वनरक्षक भरती प्रक्रिया सन २०१६.**

**<u>ओळखपत्र</u>**

१. उमेदवारा अर्ज / चेस्ट क्रमांक **KOP** | | | | | |

अर्जावर चिकटवलेले अलीकडील कालावधीचे छायाचित्र

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव
(आडनांव) ------------------

(वडिलांचे / पतीचे नांव) ------------------

स्वतं:चे नांव ------------------

उमेदवाराची स्वाक्षरी

१०. वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

**१२. निवड प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | विविध माध्यमातुन प्रसिध्दी देऊन ऑनलाईन अर्ज मागविणे.<br>वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख. | दिनांक २६.९.२०१६ |
| २ | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दिनांक १७.१०.२०१६ |
| ३ | प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार उमेदवारांची शारीरीक पात्रता तपासणीचा कार्यक्रम व ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणीचा कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक २०.१०.२०१६ |
| ४ | उमेदवारांची शारीरीक पात्रता तपासणे (ऊंची,छातीचे माप व वजन) | दिनांक २२.१०.२०१६<br>ते<br>दिनांक २४.१०.२०१६ |
| ५ | शारिरीक अर्हतामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| ६ | ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणीमध्ये नियमानुसार १:३ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिध्द करणे | दिनांक २.११.२०१६ |
| ७ | धावण्याची चाळणी चाचणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक व इतर अर्हता बाबत प्रमाणपत्र तपासणी करणे. | दिनांक ९.११.२०१६ ते<br>दिनांक ११.११.२०१६ |
| ८ | उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.५०% भारांकन + शासन पत्र दिनांक २१.७.२०१४ अन्वये ५ कि.मी. / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज करुन निवड यादी तयार करुन (२५ कि.मी./१६ कि.मी. अंतर चार तासात पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता चाचणी पात्रतेच्या अधिन राहून) जाहिर करणे व शारिरीक क्षमता चाचणी करीता कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक १८.११.२०१६ |
| ९ | निवड झालेल्या उमेदवारांची चार तासात २५ कि.मी./१६ कि.मी. अंतर पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता चाचणी घेणे | दिनांक २०.११.२०१६ |
| १० | चार तासात २५ कि.मी./१६ कि.मी. अंतर पूर्ण करण्याच्या शारिरीक क्षमता चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारास वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्यास कळविणे तसेच सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकिय फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करणे. | दिनांक २१.११.२०१६ ते<br>दिनांक ३०.११.२०१६ |
| ११ | वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांनी उमेदवारांना वनरक्षक पदावरील नियुक्तीचे आदेश देणे | दिनांक १.१२.२०१६ |

**टीप :- वरील कालबध्द कार्यक्रमामध्ये परिस्थितीनुरुप बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.** याबाबत संकेतस्थळावर वेळोवळी सुधारित कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## १३. (i) शारीरीक पात्रता तपासणीचे स्थळ आणि वेळ.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे
कार्यालय, वनवर्धन बिल्डींग, हेड पोस्ट
ऑफिससमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३

**दिनांक --------- ते --------------**

## (ii) शारीरीक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ.

पंचतारांकित एमआयडीसी, कागल
दिनांक ----------- रोजीपासून

अधिक व अद्यावत माहिती वेळोवेळी महाऑनलाईन च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.